लोकमत

# परीक्षेच्या वेळापत्रकाबाबत सोमवारी निर्णय

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षेच्या वेळापत्रकाबाबतचा अंतिम निर्णय सोमवारी (दि. १८) होण्याची शक्यता आहे. त्यासाठी विद्यापीठाने शैक्षणिक सत्र आणि परीक्षा वेळापत्रक निश्चितीसाठी नियुक्त केलेल्या १८ सदस्यीय समितीची सकाळी साडेअकरा वाजता बैठक होणार आहे.

कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्यासह समिती सदस्यांची शुक्रवारी दुपारी एक ते अडीच वाजेपर्यंत ऑनलाईन बैठक झाली. त्यात प्रत्येक सदस्याने त्यांच्याकडे असलेल्या विद्याशाखेतील परीक्षा घेण्याबाबतचे प्राथमिक नियोजन, काही अडचणींची माहिती दिली.

वेळापत्रक निश्चितीबाबत निर्णय घेण्यासाठी सोमवारी पुन्हा ऑनलाईन बैठक होणार असल्याची माहिती समितीचे अध्यक्ष डॉ. डी. जी. कणसे यांनी दिली.

पुढारी

संक्षिप्त



तेरवाड : पंचगंगा नदीतील पाण्याचे नमुने घेताना प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी.

# 'प्रदूषण'कडून पंचगंगेच्या पाण्याचे पुन्हा नमुने

**कुरुंदवाड (पुढारी वृत्तसेवा) :** प्रदूषण नियंत्रण मंडळाने तेरवाड (ता. शिरोळ) बंधाऱ्याजवळ पंचगंगा नदीच्या पाण्याचे दुसऱ्यांदा नमुने घेतले आहेत. लॉकडाऊननंतर पाणी पुन्हा प्रदूषित झाल्यास आपणास जबाबदार धरले जाईल, असा इशारा स्वाभिमानी संघटनेचे बंडू पाटील, विश्वास बालीघाटे यांनी दिला आहे. संचारबंदीमुळे गेल्या दोन महिन्यांपासून औद्योगिक वसाहत बंद असल्याने नदी प्रदूषणमुक्त झाली आहे. पालकमंत्री सतेज पाटील यांनी पंचगंगा नदीचा उगम ते संगमापर्यंत ठिकठिकाणचे पाण्याचे नमुने घेऊन पंचगंगा प्रदूषणमुक्त ठेवण्यासाठी अहवाल देण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे क्षेत्रीय अधिकारी सचिन हरबड, कोल्हापूर महापालिकेच्या पर्यावरण विभागाचे केवल लोट, शिवाजी विद्यापीठाचे अजय गौड यांनी शुक्रवारी दुपारी तेरवाड बंधाऱ्यावरून दुसऱ्यांदा पाण्याचे नमुने घेतले.